# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

### गुरुवार, दिनांक १३ जुलै, २०२३ / आषाढ २२, १९४५ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**७७.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ५८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. त्यापैकी ३४ निवेदनांपैकी ०६ निवेदने दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ६० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. एकूण २८ निवेदनांपैकी ०५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ७३ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता २३ निवेदनांपैकी ०४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १३ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्र.७८२ गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे हिवाळी (तिसरे) अधिवेशन

श्री. राजेश पवार वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७८२ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील अनेक ग्रामीण भागात अवैध दारूविक्री मोठया प्रमाणात सुरू असून या दारुच्या व्यसनामुळे अनेक तरुण व्यसनाधीन होऊन अनेकांचे संसार उध्वस्त होणे, कौटुंबिक हिंसाचार वाढण्याचे प्रकार होणे, त्याचबरोबर राज्याचा महसूल बुडणे, राज्य शासनाने दारुबंदी विरोधात आंदोलन केल्यानंतर गावात दारू बंदी करणे आवश्यक असतानाही अनेक वेळा स्थानिक पोलिस प्रशासन अर्थपूर्ण व्यवहारामुळे या अवैध दारू विक्रीला प्रोत्साहन देणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यात पोलीसांमार्फत अवैध दारूविक्रीबाबत माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०२२ पर्यंत एकूण ७५४८५ दाखल गुन्हयात ४८८१३ आरोपीना अटक केली असून एकुण रूपये ५९.४० कोटी रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये अवैध दारु संबंधी दि. २५ मे ते १५ जून २०२२ तसेच दि.१७ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२२ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात आली असून त्याअंतर्गत अनुक्रमे ८७२३ व ७६२१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सबब राज्यात अवैध दारू विक्रीला प्रतिबंध करण्यासाठी पोलीसांमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत अवैध दारूविक्रीबाबत दि. १ एप्रिल, २०२२ ते २१ डिसेंबर, २०२२ अखेर एकूण ३७,११८ गुन्हे दाखल करून एकूण रूपये ११७.२१ कोटी रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत रुपये १७,२२८.८४ कोटी इतका महसूल शासनास जमा करण्यात आलेला आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात दि. १ एप्रिल,२०२२ ते दि.२१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत रुपये १४,०६९.४६ कोटी इतका महसूल शासन जमा करण्यात आलेला आहे. गतवर्षी या कालावधीत रुपये १०,८४९.७६ कोटी इतका महसूल जमा झालेला होता. या वर्षी जमा महसूलामध्ये झालेली वाढ ही गतवर्षीपेक्षा २९.६८% इतकी जास्त आहे.

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९, ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे

आदेश, २००८ आणि शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक १२.०२.२००९ अन्वये स्थानिकांची बहुमताने मागणी असल्यास मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील अवैध धंदे व हातभट्टी विरुद्ध कडक कारवाई करण्याच्या अनुषंगाने विशेष मोहिम राबविण्याबाबत, अवैध दारु धंद्यांवर पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी एकत्रित कार्यवाही करण्याबाबत, तसेच विषारी दारुच्या सेवनामुळे होणा-या दुर्घटना टाळण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाने निर्गमित केलेल्या सूचनाची अमंलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस घटकाना सूचना निर्गमित केल्या आहेत.

***************

<u>लक्षवेधी सुचना क्रमांक-१७६३</u>

## महाराष्ट्र विधानसभा

**विधानमंडळाचे सन २०२२ चे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.बाळासाहेब आजबे, श्री.संदिप क्षिरसागर, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"बीड जिल्ह्यातील आष्टी, तालुक्यातील जवळपास ४५० एकर हिंदू देवस्थान व वक्फच्या इनाम जमिनी बणावट करून खालसा आदेशाच्या माध्यमातून जवळपास १००० रु. कोटी मालमत्ता हसतानंतर करणे, महसूल विभागाकडून या जमिनी बेकायदेशीरित्या संगणमत कारस्थान करून रॅकेटच्या माध्यमातून खाजगी व्यक्तीच्या नावे होणे, या सर्व जमिनी देवस्थान खिदमतमास इनाम भोगवटदार वर्ग-२ असणे, शासनाने महसूल विभागाची विशेष तपास पथक नियुक्त करणे, महसूल खात्याच्या व पोलीस चौकशीत बनावट प्रकरण सिद्ध होणे, शासनाकडून कारवाई होत नसल्यामुळे सदर प्रकरण मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे क्रिमिनल रिट पिटीशन दाखल होणे, मा. उच्च न्यायालयच्या १८.११.२०२२ च्या आदेशा नंतरही गुन्हा दाखल करण्यास विलंब होणे, पोलीस व महसूल प्रशासनाकडून आरोपीला मदत होणे, राजकीय दबावापोटी तपास अधिकारी एका दिवसातच बदलणे, मुख्य सुत्रधाराकडून तपासाची दिशा बदलण्याचे प्रयत्न होणे, आष्टी पो.स्टे. येथे गुन्हा दाखल होऊनही आरोपीला अटक न होणे, आरोपीला मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल करण्यासाठी संधी देणे, मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल फेटाळण्यात येणे, तक्रारदाराच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, तक्रारदाराचे असलेले पोलीस संरक्षण काढण्यात व बीड पोलिस अधिकारी मार्फत फोन लोकेशन घेऊन तक्रारदार त्रास देणे त्याची हत्येचा कट रचणे, या प्रकरणात महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन हतबल होणे, यामुळे आष्टी तालुक्यामधील भाविकांमध्ये व नागरिकांमध्ये प्रशासन व शासनाच्या विरोधात पसरलेला तीव्र असंतोष व या बाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व उपाययोजना"

## मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ७४६/२०२२ दाखल करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्यामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली होती. सदर प्रकरणी एकूण ०८ हिंदू देवस्थानांच्या एकूण १३२ हेक्टर ५४ आर (३३२ एकर ४ आर) इनाम जमिनी हस्तांतरण प्रकरणात पोलीस ठाणे आष्टी, जिल्हा-बीड येथे दिनांक २९.११.२०२२ रोजी गु.र.नं.३८६/२०२२ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-१९८८ (सुधारणा २०१८) चे कलम १३ (१) (अ)(ब), १३(२) तसेच भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८,

४७१, १२०(ब), १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु आहे.

देवस्थान इनाम जमिनी हस्तांतरण प्रकरणात १) अर्ज करणारे २) जमिन हस्तांतरणास संमती देणारे ३) उप जिल्हाधिकारी (सामान्य) भु-सुधार, बीड येथील तत्कालीन अव्वल कारकुन ४) तत्कालीन उप जिल्हाधिकारी (सामान्य) भु-सूधार, बीड ५) संबंधित गावचे तलाठी ६) संबंधीत महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी इत्यादींचा प्रथमदर्शनी सहभाग असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या निदर्शनास आले आहे. सात देवस्थानच्या एकूण आठ ठिकाणच्या एकूण १३२ हेक्टर ८४ आर (३३२ एकर ४ आर ) इतक्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. तथापि, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील तपास पुर्ण झाल्यानंतर अंतिम निष्कर्ष समोर येतील.

पोलीस अधीक्षक, बीड यांच्या अधिनस्त असलेल्या विशेष तपास पथक यांच्याकडून गुन्ह्यातील आठ देवस्थानच्या जमिनीच्या संदर्भाने चौकशीची कागदपत्रे ला.प्र.वि., औरंगाबाद यांनी प्राप्त करुन घेतली आहेत. सदर गुन्ह्याचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने तहसिलदार, आष्टी यांच्याकडून गुन्ह्यातील आठही देवस्थान इनाम जमिनीचे मूळ मालक निश्चित करण्यासाठी जुने ७/१२, इनाम पत्रक, पाहणी पत्रक, खासरा पत्रक तसेच धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडून देवस्थान ट्रस्टची कागदपत्रे, देवस्थानच्या इनाम जमीन हस्तांतरणाच्या मूळ संचिका, ३ देवस्थानच्या इनाम जमीन हस्तांतरणाबाबत अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अपिलीय निर्णय संचिका ला.प्र.वि., बीड यांनी प्राप्त करुन घेतल्या आहेत. तसेच या पूर्वी महसुल विभाग अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विशेष चौकशी समिती (SIT) यांचा अहवाल जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

हैद्राबाद इनमा निर्मुलन व रोख अनुदाने कायदा, १९५४ सुधारणा अधिनियम २०१५ नुसार वक्फ बोर्ड च्या प्रशासनिक इनाम जमिनी, देवस्थानच्या सेवा इनाम (खिदमतमाश) जमिनी, सरकारी इनाम जमिनी, मदतमाश इनाम जमिनीचा काही भाग हा सेवा इनाम म्हणून बहाल करण्यात आलेल्या जमिनी इत्यादी जमिनींचे हस्तांतरण कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही, असे सुधारणा अधिनियम २०१५ मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. सदर इनाम जमिनी कोणत्या प्रकारच्या आहेत, हे ठरविण्याची जबाबदारी उपलब्ध अभिलेखावरुन अपिलीय अधिकारी म्हणजेच उप जिल्हाधिकारी (सामान्य) भु-सूधार यांची असल्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. तरी देखील या सर्व बाबींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन लबाडीने व अप्रमाणिकपणे अधिकाराचा गैरवापर करुन संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी सदर अधिनियमाचा गैरवापर करुन देवस्थानच्या सेवा इनाम जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण केलेले प्रथमदर्शनी दिसून येत आहे. उपलब्ध दस्ताऐवजाच्या आधारे हा सर्व पूर्वनियोजित कट असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीत निदर्शनास आले आहे.

उपरोक्त गुन्हा दाखल झाल्यापासून गुन्ह्यांचा तपास उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या अधिका-यांनी केला असल्याने राजकीय दबाबापोटी तपास अधिकारी एका दिवसात बदलेले आहे, असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

तसेच सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडील निकाल हा आरोपीच्या विरोधात गेल्याने आरोपीने मा.सर्वोच्च न्यायालयाकडे अपील क्रमांक ३६२१३/२०२२ अन्वये अपील दाखल केले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर अपील फेटाळलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांच्या फोनचे लोकेशन घेवून त्यांना त्रास देण्याबाबतची कोणतीही कार्यवाही बीड पोलीस घटकातील अधिका-यांकडून झालेली नसल्याची पोलीस अधीक्षक, बीड यांच्या दिनांक २७.१२.२०२२ रोजीच्या पत्रात नमूद केलेले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने प्रशासन कोणत्याही दबाबाखाली काम करत नसून सदर गुन्ह्याचा तपास नि:पक्षपातीपणे सुरु आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ८६६**

**श्रीमती ऋतुजा लटके, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"अंधेरी पूर्व विधानसभा क्षेत्रात अंधेरी पूर्व व पश्चिम जोडणाऱ्या गोखले पुलाचे काम सुरु असल्याने दोन्ही मार्गिका वाहतुकीसाठी बंद असणे, त्यामुळे अंधेरी, विलेपार्ले परिसरात मोठ्या प्रमाणात होत असलेली वाहतुक कोंडी, सदर मार्गिका लवकरात लवकर सुरु करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून होत असलेली मागणी, या पुलाचा संरचनात्मक आढावा चाचणी करण्यात आली असून अहवालही प्राप्त झालेला असणे, तसेच पुलाचे आयआयटी मुंबई व व्हीजेटीआय यांनी स्ट्रक्चरच ऑडिटदेखील केले असून त्यासंदर्भातील अहवाल महानगरपालिकेला सादर केलेला असणे, परंतु सदरहू दोन्ही अहवालांमधील निर्देश व सूचनांत तफावत असल्याचे निदर्शनास आलेले असल्याने पुलाचे नवीन स्ट्रक्चरल ऑडीट करुन अहवाल सादर करण्याची आवश्यकता, सदर पुलाच्या कामाकरिता करारनाम्यानुसार दोन वर्षांचा कालावधी अपेक्षित असल्याने सदर मार्गावरील वाहतूक अंधेरी सबवे व मिलन सबवे येथे वळविण्यात आलेली असणे, परंतु या सबवे मध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठत असल्याने सबवे पूर्णत: वाहतूकीकरिता बंद होत असणे, पुलाचा कामाचा कालावधी पाहता या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या नागरिकांना, विद्यार्थ्यांना, ज्येष्ठांना गैरसोयीचे होणार असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी घटनास्थळी जाऊन केलेला पाहणी दौरा, त्याअनुषंगाने संबंधित विभागाशी केलेला पत्रव्यवहार, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने लक्ष घालून तात्काळ एक मार्गिका सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील विविध पुलांची तपासणी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०४.०५.२०२२ रोजी मे. एस.सी.जी. कन्सलटंसी सर्व्हिसेस यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे. एस.सी.जी. कन्सलटंसी सर्व्हिसेस यांनी अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या गोखले पुलाची पाहणी करुन, सदर पूल जीर्ण अवस्थेत असल्यामुळे तो वाहतुकीसाठी बंद करावा असे अभिप्राय दिले. तद्नंतर सदर पूल दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ पासून बंद करण्यात आला आहे.

सदर पुलाच्या दोन्ही पोहोच मार्गाच्या कामासाठी (रेल्वे भाग वगळून) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे एप्रिल, २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आला होता. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव व वाहतूक विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेला विलंब या कारणांमुळे सदर

पुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये सुरु करण्यात आले. सदर पुलाची उंची १.५ मी. ने वाढविणे आवश्यक असल्याचे रेल्वेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविल्यानुसार आराखडे सुधारीत करण्यात आले.

सदर पुलाच्या रेल्वे क्रॉसिंगचा सर्वसाधारण आराखडा, संकल्पचित्रे इत्यादींची आय. आय. टी., मुंबई यांचेमार्फत फेरतपासणी करुन घेण्यात आली असून, सदर आराखडा व संकल्पचित्रे यांना रेल्वे प्राधिकरणाकडून दिनांक १६.०५.२०२३ रोजी अंतिम मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पुलाच्या रेल्वेवरील भागाच्या पुनर्बांधणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून, त्यास कार्यादेश देण्यात आले आहेत. रेल्वेवरील पुलाच्या निष्कासन व पुनर्बांधणी इत्यादी कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिका व रेल्वे प्राधिकरण यांच्यासमवेत प्राधान्याने करण्यात येत आहे.

सदर पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्यामुळे, सदर पुलावरील वाहतूक दक्षिणेकडील कॅप्टन गोरे पूल, मिलन आर.ओ. बी. व उत्तरेकडील अंधेरी सब-वे, बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल येथे वळविण्यात आली आहे.

सद्य:स्थितीमध्ये दिनांक १२ जून, २०२३ पर्यंत गोखले पुलाचे बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील पहिल्या टप्प्यातील उतार मार्गाचे काम ८०% पूर्ण झाले आहे. रेल्वे हद्दीतील गोखले पुलाचे निष्कासनाचे काम पश्चिम रेल्वे प्राधिकरणामार्फत माहे मार्च, २०२३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सदर पुलाच्या रेल्वे हद्दीतील बांधकामावर देखरेख ठेवण्यासाठी पश्चिम रेल्वे प्राधिकरणाचे प्रतिनिधी म्हणून मे. राईट्स लि. यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पुलाच्या पहिल्या मार्गिकेच्या रेल्वे हद्दीतील ओपन वेब गर्डरची बांधणी मे. एच.एम.एम. लिमिटेड, अंबाला यांच्याकडून करण्यात येत आहे. गोखले पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या महापालिका हद्दीतील एकूण १८ ट्रेसल्स फाऊंडेशनपैकी १० फाऊंडेशनचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

सदर पुलाच्या पहिल्या मार्गिकेचे बांधकाम माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत करण्याचे नियोजित असून, उर्वरित बांधकाम पश्चिम रेल्वे प्राधिकरणाच्या संयुक्त निरीक्षणाखाली प्रगतीपथावर आहे.

***********

# <u>महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ च्या चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन</u>
## लक्षवेधी सूचना क्रमांक ६९२

श्री.सुनिल प्रभू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.६९२ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईसह राज्यात करोना संकट व त्या काळानंतर ओ.टी.टी. व मल्टीप्लेक्स आदि मनोरंजनाच्या नव्या माध्यमामुळे प्रेक्षकांनी पाठ फिरवल्यामुळे एक पडदा चित्रपटगृहे आर्थिक संकटात सापडणे, यामुळे राज्य शासनाने सदरहू चित्रपटगृहे बंद करुन त्याजागी इतर व्यवसाय करण्यासाठी परवानगी देण्याची राज्य भरातील चित्रपट गृहाच्या मालकांनी दि.१८.११.२०२२ च्या सुमारास राज्य शासनास दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे करणे, करोना संकटामध्ये एक पडदा चित्रपटगृह पूर्णपणे बंद असतानाही राज्य शासनाकडून मालमत्ता कर, वीज बील, हॉर्डींग कर असे नाना विविध कर आकारले जात असल्याने चित्रपटगृह मालक आधिकच आर्थिक संकटात सापडणे, चित्रपटगृहाच्या जागी चित्रपटगृहाचीच बांधणी करावी तसेच नव्या एक पडदा चित्रपट गृहात १५० आसने बंधनकारक अट घातल्याने पिडयानपिडया चालत आलेला एक पडदा चित्रपट गृहाचा व्यवसाय सध्या वाढत्या महागाईच्या काळात सुरु ठेवणे शक्य होत नसल्याने नव्या अटीनुसार बांधलेल्या चित्रपटगृहास प्रक्षेकांचा प्रतिसाद मिळत नसल्याने मोठे आर्थिक नुकसान होण्याची भिती चित्रपटगृह मालकांमध्ये निर्माण होणे, या जाचक अटीमुळे त्याजागी नवा कोणताही व्यवसाय सुरु करु शकत नसल्याने अथवा सदरहू जागा भाडयाने देऊन त्यातून भांडवल मिळविता येत नसल्याने सदरहू जाचक अट रद्द करण्याची विनंती चित्रपटगृह मालकांनी राज्य शासनाकडे करण्यात येणे, तसेच एक पडदा चित्रपटगृहाचा मालमत्ता कर, परवाना नुतनीकरण शुल्क आणि वीज बील सवलत देणे, बॅनर कर रद्द करणे, प्रत्येक प्रयोगापोटी आकारले जाणारे शुल्क रद्द करणे आदि मागण्या मान्य करुन चित्रपटगृह मालकांना दिलासा देणेबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील चित्रपटगृह मालकांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## <u>मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे निवेदन</u>

<u>चित्रपटगृहाचा मालमत्ता कर रद्द करणे व बॅनर कर रद्द करणे</u>

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०५ (१) नुसार राज्य शासन, याबाबत जे कोणतेही सर्वसाधारण अथवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून, नगरपरिषद या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता खालील यादीत देण्यात आलेले कर बसवील. त्यातील (ड) नुसार चित्रपट, नाट्यगृहे, सर्कशी, आनंद बाजार व इतर कार्यक्रम व प्रयोग यावरील कर याचा देखील यात समावेश असून चित्रपटगृहांना मालमत्ता सवलत देणेबाबत या अधिनियमात कोणताही उल्लेख आढळून येत नाही. मात्र, दरवर्षी अशी सुट दिल्याने नगरपरिषदेस जी तुट येईल, त्या तुटी एवढ्या रकमेची संबंधीत नगरपरिषदेस प्रतिपूर्ती राज्य शासनास करता येईल, अशी तरतूद आहे.

रोटा H/457 (750-7-23)-1

नगरपालिकेची महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये होर्डींगबाबत कर आकारणी धोरण निश्चित करण्यात आलेले असून, त्या-त्या नागरी स्थानिक संस्थांकडे देण्यात आलेले आहेत. शासनाने शुल्क ठरवून दिलेले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्नाचे स्रोत मूळातच मर्यादित आहे. राज्यातील सर्व एक पडदा चित्रपटासाठी मालमत्ता करात सवलत देणे व बॅनर कर रद्द करणे याबाबत सरसकट निर्णय घेतल्यास नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसूलात घट होईल. परिणामी, या संस्थांकडून शासनाकडे अनुदानाची मागणी केली जाईल व अशा कर माफी प्रकारच्या अनेक मागण्या विविध क्षेत्रातून शासनाकडे येत राहतील. त्यामुळे शासनाने यामध्ये हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही.

**प्रत्येक प्रयोगासाठी आकारले जाणारे शुल्क रद्द करणे**

चित्रपटगृहांकडून प्रत्येक प्रयोग/ खेळासाठी पोलीस विभागाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

**विज बील सवलत देणे**

विज नियामक आयोग यांच्या बहुवार्षिक वीजदर आदेश दि.३०.३.२०२० अन्वये महाराष्ट्रातील एक पडदा चित्रपटगृह / थिएटर या आस्थापनांना लघुदाब व उच्चदाब वाणिज्यिक वर्गवारी लागू असून, शासन निर्णय दि.२१.१०.२०१६ नुसार चित्रपटगृहांना वाणिज्यिक वर्गवारीत समाविष्ट केले आहे. त्यामुळे लॉकडाऊनच्या काळात व्यापारी व औद्योगिक वीज ग्राहकांचे, माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये लागू असलेले स्थिर आकार स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर ते अनुक्रमे माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२० या महिन्यांच्या वीज देयकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले होते. याव्यतिरिक्त कोविड- १९ कालावधी करिता महावितरणच्या औद्योगिक आणि वाणिज्यिक ग्राहकांच्या वीजदरामध्ये खालीलप्रमाणे सवलती/सुट दिलेली होती.

- ०.३ बिलींग सायकलसाठी औद्योगिक आणि वाणिज्यिक वर्गवारीच्या स्थिर आकाराची वसुली पुढे ढकलली (moratorium period).
- जर ग्राहकाने संपुर्ण (moratorium) कालावधीतील रक्कम एकर कमी भरण्याचे अवलंबिल्यास, सदर रकमेवर १% ची सूट सदर ग्राहकास देण्यात आली.
- उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना आणि उच्चदाब वाणिज्यिक ग्राहकांना त्यांची करार मागणी एका बिलींग सायकलमध्ये ३ वेळा बदलण्यास परवानगी दिली.
- मागणीवर आधारित वीजदर लागू असलेले लघुदाब औद्योगिक आणि लघुदाब वाणिज्यिक ग्राहकांना त्यांची करार मागणी एका बिलींग सायकलमध्ये २ वेळा बदलण्यास परवानगी दिली.
- लॉकडाऊनच्या काळात स्वयंचलित मीटर रिडींग शक्य नसल्यास प्रत्यक्ष रिडींग उपलब्ध होईपर्यंत औद्योगिक आणि वाणिज्यिक ग्राहकांना त्यांच्या सरासरी वीजवापराच्या फक्त १०% टोकन रक्कम आकारण्यात आली.
- ग्राहकांना त्यांची मागणी कमी करण्याची सुविधा संगणकीय प्रणालीद्वारे (Auto Reduction Facility) उपलब्ध करून देण्यात आली होती.

H/957-1a

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देऊन त्यानुसार अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार शासनास प्रदान करण्यात आलेले आहेत. शासनाने अनुदानित वीज दर ठरविल्यानंतर महावितरणतर्फे सदर वीज दर आकारणी करण्यात येते. मात्र, सदरील अनुदानापोटी येणाऱ्या आर्थिक भाराची शासनाने अग्रिम अनुदान देऊन प्रतिपूर्ती करणे क्रमप्राप्त आहे.

*************

H/457-2